

# मी ‘दाक्षायणी वेलायुधन’ बोलतेय!

माझं नाव दाक्षायणी... दाक्षायणी वेलायुधन.

माझा जन्म ४ जुलै १९१२ रोजी केरळमधल्या मुळावुकड या छोट्याशा गावात झाला. मी पुलया समाजात जन्मले – त्या काळी ज्यांना सार्वजनिक रस्त्यावर चालायलाही बंदी होती. उच्चवर्णीय व्यक्ती दिसली तर ठराविक अंतर राखावं लागे. आमच्या स्त्रियांना तर छाती झाकण्याचाही अधिकार नव्हता. अपमान, अवहेलना आणि अन्याय – हेच आमचं दैनंदिन वास्तव होतं.

माझ्या जन्मानंतरच्या वर्षी, १९१३ मध्ये, आमच्या समाजाने अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी सभा बोलावली. पण जमीन देण्यास नकार देण्यात आला. मग आमच्या लोकांनी काय केलं माहिती आहे?

समुद्रात बोटी एकत्र केल्या, बांबूंनी जोडून मोठा तराफा तयार केला... आणि त्या तराफ्यावर सभा घेतली. कारण जमीन राजाची असू शकते... पण समुद्र कोणाचाच नसतो. जात जमिनीवर असते, समुद्रावर नाही. म्हणूनच माझ्या चरित्राचं नाव आहे – “द सी हॅज नो कास्ट.” समुद्राला जात नसते.

माझ्या घरातच प्रतिकाराचा वारसा होता. अन्यायाविरोधात उभं राहणं मला शिकवावं लागलं नाही – तो माझ्या रक्तातच होता.

मी शिकले सेंट मेरी’ज शाळेत. पुढे एम.एल.सी.सी. हायस्कूलमध्ये. आणि मग कोचिनच्या महाराजा’ज कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये जाणारी मी पहिली अनुसूचित जातीची महिला होते... आणि विज्ञान घेणारी पहिली मुलगी! लोक मला पाहायला कॉलेजच्या गेटबाहेर गर्दी करत. पण शिक्षणानं जात संपली नाही. शिक्षिका झाले तेव्हा विहिरीवर पाणी भरू दिलं नाही. शिक्षक परिषदेत वेगळं बसवलं गेलं.

मी महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित झाले. त्यांच्याच आश्रमात – सेवाग्राममध्ये – माझं लग्न

आर. वेलायुधन यांच्याशी झालं. साधं लग्न. कस्तुरबांनी विणलेली साडी. जेवणात चपाती आणि गूळ. मी मासे खाणारी; पण गांधीजींनी मला सांगितलं – “तुला तुझ्या आहाराचं स्वातंत्र्य आहे.”

त्या दिवशी मला समजलं – खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर.

पुढे मी कोचिन कायदेमंडळावर नियुक्त होणारी पहिली अनुसूचित जातीची महिला झाले. पंचायत आणि नगरपालिकांमध्ये आमच्या समाजाला प्रतिनिधित्व मिळावं यासाठी आवाज उठवला. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्यूल कास्ट फेडरेशनच्या ‘जय भीम’ साप्ताहिकाची व्यवस्थापकीय संपादक होते. मी काँग्रेसवर टीका केली… पण आंबेडकरांवरही मतभेद असतील तर ते मांडले. कारण माझी निष्ठा पक्षाशी नव्हे – न्यायाशी होती.

१९४६ मध्ये, वयाच्या ३४ व्या वर्षी, मी मद्रास प्रांतातून संविधान सभेत निवडून गेले. तिथे मी सर्वात तरुण आणि एकमेव अनुसूचित जातीची महिला होते. संविधान सभेत मी म्हटलं – “राज्यघटनेचं काम फक्त राज्य आणि नागरिक यांचं नातं ठरवणं नाही; तर संपूर्ण समाजाचं पुनर्घटन करणं आहे.”

मी केंद्राच्या जास्तीच्या अधिकारांवर टीका केली. राज्यांवर वर्चस्व नको, विकेंद्रीकरण हवं – असं ठामपणे मांडलं. काही मुद्द्यांवर मी लोकप्रिय मताच्या विरोधात उभी राहिले. माझी मतं सर्वांना पटली नाहीत. पण मी भीती न बाळगता ती मांडली.

एक काळ असा आला की मी पूर्णवेळ राजकारण सोडलं. कारण कुटुंब चालवणं, मुलांना वेळ देणं – हेही तितकंच महत्त्वाचं होतं. मी विमा कंपनीत नोकरी केली. २१ वर्षं प्रामाणिकपणे काम केलं. सत्ता, पद, प्रसिद्धी – यांच्यापेक्षा मला मूल्यं महत्त्वाची वाटली.

१९७० च्या दशकात मी पुन्हा सामाजिक चळवळीत उतरले. ‘महिला जागृती परिषद’ उभी केली. दलित महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम केलं. २० जुलै १९७८ रोजी मी या जगाचा निरोप घेतला.

पण माझा संदेश आजही तितकाच जिवंत आहे – **“समुद्राला जात नसते… माणसालाही नसावी.” “न्याय, स्वाभिमान आणि समानता – हे कागदावर लिहून चालत नाही. ते जगावं लागतं.”**